पशुसंगोपन

# व्यावसायिक दृष्टिकोनातून वराहपालन



**डॉ. पंकज हासे**
(मो.नं. ९८९०२४८४९४)
सहायक प्राध्यापक
**डॉ. मंजूषा पाटील**
चिकित्सालय निबंधक
**डॉ. सुजाता सावंत**
स्नातकोत्तर पशुवैद्यक व
पशुविज्ञान संस्था, अकोला



पाळीव पशूंपैकी गाई, म्हशी प्रतिवर्षी आपल्या संख्येच्या ०.७- १.० पट वाढतात. शेळ्या आणि मेंढ्या आपल्या संख्येच्या २.५ पट वाढतात, परंतु वराह आपल्या संख्येच्या ८ पट वाढतात आणि खाल्लेल्या अन्नाचे जलदरित्या व जास्तीत जास्त प्रमाणात मांसामध्ये रुपांतर करतात. त्यामुळे युरोपीय राष्ट्रांमध्ये व्यावसायिकांचा अधिकाधिक कल या क्षेत्राकडे आहे. म्हणूनच आपण भारतीयांनीही वराहपालनाचा व्यापारी दृष्टिकोनातून विचार करायला हवा.

पुराणग्रंथांमध्ये वराहाचा वाहन म्हणून उपयोग केल्याचे आपण अनेकदा वाचतो. परंतु पुराणामध्ये त्याचा उल्लेख झाला म्हणून की काय ‘पुराणातल्या गोष्टी पुराणातच’ या न्यायाने आजही हा प्राणी दुर्लक्षित राहिलेला आहे. मानवी शरीरसंस्थेशी माकडाइतकाच समानता दर्शविणारा वराह सामाजिकदृष्ट्या जरी अस्वच्छ समजला जात असला तरी शास्त्रीय व व्यावसायिक दृष्टिकोनातून वराहपालनाइतका किफायतशीर जोडधंदा कोणताही नाही.

पाळीव पशूंपैकी गाई, म्हशी प्रतिवर्षी आपल्या संख्येच्या ०.७- १.० पट वाढतात. शेळ्या आणि मेंढ्या आपल्या संख्येच्या २.५ पट वाढतात, परंतु वराह आपल्या संख्येच्या ८ पट वाढतात आणि खाल्लेल्या अन्नाचे जलदरित्या व जास्तीत जास्त प्रमाणात मांसामध्ये रुपांतर करतात. त्यामुळे युरोपीय राष्ट्रांमध्ये व्यावसायिकांचा अधिकाधिक कल या क्षेत्राकडे आहे. म्हणूनच आपण भारतीयांनीही वराहपालनाचा व्यापारी दृष्टिकोनातून विचार करायला हवा.

सद्य:स्थितीत जगामध्ये ९२५ दशलक्ष डुकरे आहेत, त्यापैकी निम्मी चीनमध्ये आहेत, तर हॉलंड या राष्ट्रात लोकवस्तीइतकीच डुकरांची संख्या आहे. इंग्लंडसारखे प्रगत राष्ट्र अर्धी मांसाची गरज डुकराच्या मांसाची आयात करून भागवते.

### वराहांच्या विविध जाती

१. विदेशी वराह, २. स्थानिक वराह, ३. जंगली वराह, ४. संकरित वराह.

वरीलपैकी विदेशी जातीच्या वराहांची भारतीय परिस्थितीत झालेली शारीरिक वाढीतील श्रेष्ठता व व्यावसायिक उपयुक्तता सिद्ध झालेली असल्याने, हा व्यवसाय करणाऱ्याने विदेशी जात वराहपालनासाठी प्राधान्याने निवडावी. यामध्ये- यॉर्कशायर, लार्ज व्हाईट यॉर्कशायर, मिडल व्हाईट यॉर्कशायर, हॅम्पशायर, वर्कशायर, चेस्टर व्हाईट, ड्यूरॉक, टॉमवर्ट, पोलंड, चायना या प्रमुख विदेशी जाती आहेत.

### वराहपालनाच्या दोन मुख्य पद्धती

१. २ ते २.५ महिने वयाची वराहाची पिल्ले विकत घेऊन त्यांना वाया जाणारा भाजीपाला, हॉटेलातील उष्टे अन्न देऊन विक्रीसाठी तयार करणे.



२. चांगल्या जातीचे वराह विकत घेऊन त्यांच्यापासून वराह पैदास करणे, त्यापासून मिळणारी पिल्ले सहा महिने वाढवून विक्री करणे.

### वराहांसाठी निवारा

१) बंदिस्त पद्धत २) मोकळी पद्धत

१) **बंदिस्त पद्धत** : ही पद्धत व्यावसायिकदृष्ट्या महत्त्वाची आहे. यामध्ये फार्मवर वराहांच्या विविध वयानुसार पक्की घरे बांधलेली असतात. पैदास करणाऱ्याने साधारणत: १० ते १२ माद्यांसाठी १ नरप्रमाणे मोठी जनावरे ठेवावीत. एका वराहाला सरासरी २ बाय ३ फूट एवढी जागा लागते. याव्यतिरिक्त हालचालीसाठी अधिक जागा असणे आवश्यक आहे.

खाद्यासाठी २ मी. बाय १८ मी. एवढी जागा ४० ते ६० वराहांना लागते. पाण्यासाठी कॉंक्रिटने तयार केलेले २० सें.मी. बाय ३० सें.मी. बाय १५ सें.मी. आकाराचे भांडे करावे.

२) **मोकळी पद्धत** : ही पद्धत व्यावसायिक लोक फारशी वापरत नसले तरी ग्रामीण भागात विशिष्ट समाज या प्रकारचे वराहपालन करतो. यामध्ये वराह पूर्णपणे मोकळे सोडून दिले जातात. त्यांच्यावर कोणतेही खाद्याचे, पिण्याचे बंधन नसते. मात्र अशा प्रकारचे वराहपालन समाजासाठी अपायकारक आहे.

### वराहांसाठी खाद्य

वराहांचे मुख्य खाद्य स्टार्च आहे- जसे मका, बटाटे, तांदूळ इत्यादी. तसेच तेलाची खळ, मासे आणि मटण यातून त्यांना प्रथिने मिळतात तर हिरव्या शेंगभाज्यांमधून त्यांना अतिरिक्त व्हिटॅमिन मिळते. याचबरोबर त्यांना समतोल आहारासाठी जवळ जवळ ५० टक्के धान्याची गरज आहे व वाढणाऱ्या पिल्लांना तर या धान्याव्यतिरिक्त १६ ते १८% प्रथिनांची आवश्यकता असते. सर्वसाधारण संतुलित आहाराचे

प्रमाण धान्य- ५५%, कोंडा- १३%, पेंड- १५%, ऊसाची मळी- ५%, मासळी १०%, खनिजे २% असे असावे.

वराहपालन करताना वराहाचे वजन, वय व प्रतिदिन खाद्य यांचा मेळ असणे महत्त्वाचे असते. ते खालील तक्त्यावरून तपासून पहावे.

| वराहाचे वय(महिने) | परदेशातील पिल्लांची वाढ | स्थानिक पिल्लांची वाढ | प्रतिदिन खाद्य |
|---|---|---|---|
| २ | २० कि. | ११ कि. | ०.८२५ कि. |
| ३ | ३० कि. | १९ कि. | १.३०५ कि. |
| ४ | ४५ कि. | ३० कि. | १.९८० कि. |
| ५ | ६७ कि. | ४२ कि. | २.७०० कि. |
| ६ | ९० कि. | ५८ कि. | ३.१०० कि. |
| ७ | - | ७४ कि. | ३.९३० कि. |

खाद्याला पर्याय म्हणून खाली दर्शविलेले उपाय प्रयोगात्मक तत्त्वावर अनेक व्यावसायिक करताना दिसून येतात.

१. पिठाच्या गिरणीतील सांडलेले पीठ.

२. उपाहारगृहांमधून उरलेले अन्न.

३. मंडईतून, घराघरांमधून वाया जाणारा भाजीपाला.

४. मोठ्या डेअरीमधील वाया गेलेले दूध.

५. समुद्रातून आलेली खराब म्हणून बाजूला केलेली मासळी.

६. कत्तलखान्यातील वाया गेलेले परंतु उकळून काढलेले मांस.

७) भाताच्या कण्या व कोंडा इत्यादी.

वर नमूद केलेले पर्यायी घटक कितपत प्रमाणात घातले म्हणजे किती वाढ वजनात होते, ते किती स्वस्तात पडते





इत्यादीबाबत महत्त्वाचा तपशील लेखी स्वरुपात अद्याप नाही. परंतु अनेकजण वरील पर्याय अवलंबतात.

### प्रजनन

वराहांचे प्रजनन दोन प्रकारे करता येते-

१) माद्यांच्या कळपात नर सोडून.

२) माजावर आलेली मादी व नर स्वतंत्र काढून वरीलपैकी दुसऱ्या पद्धतीत मादीला गर्भधारणा झाल्याची नक्की तारीख समजू शकते व विण्याच्या तारखेबाबतही अंदाज बांधता येतो.

पैदाशीसाठी किमान १० ते १२ माद्यांसाठी १ नर या प्रमाणात वराह ठेवले तर किफायतशीर ठरते. वराहाची पैदास क्षमता कोणत्याही प्राण्यापेक्षा अधिक आहे. एका विताच्या वेळी सरासरी १० ते १२ पिल्ले मिळतात. त्यामुळे संख्या लवकर वाढते व संगोपनाचा खर्च अत्यंत कमी येतो. त्याचबरोबर त्यांचा गर्भधारणेचा काळ फक्त १२० दिवस (४ महिने) असतो.

### प्रजननाची काही वैशिष्ट्ये

* वर्षातून दोनदा पिल्ले देते.

* माजाचा काळ लवकर १६० दिवसांत.

* पहिल्या माजाच्या वेळेस वजन १०५ किलो.

* विण्याच्या काळानंतर दूध पाजण्याचा काळ फक्त २१ ते २८ दिवस.

* पिल्ले वेगळी केल्यानंतर जननाचा कालावधी फक्त १५ दिवस.

वराहपालन एक शास्त्र आहे. वास्तविक व्यवसायात पडल्यावर प्रत्यक्ष वेगवेगळे अनुभव येतात हे खरे, परंतु सदर लेखाचा आपणास प्रारंभिक ज्ञानासाठी निश्चित उपयोग होईल. ■